

ई साहित्य प्रतिष्ठान
ebook
‘एक ऋषितुल्य गुरू’
- पं. जितेंद्रजी अभिषेकी
लेखक - अनंत पावसकर

‘ई-साहित्य प्रतिष्ठान’

सादर करीत आहे.

अनंत पावसकर

लिखित

# ‘एक ऋषितुल्य गुरू’

## - ‘पं. जितेंद्र अभिषेकी’



**© - अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)**

**anantpavaskar@gmail.com** **९८२००२२४१७**

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!

फक्त ‘एकच’ क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर

**For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com**

**(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा- एक मिनिट थांबा- बस्स)**

**तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.**

**आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !**

## ♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

**अनंत पावसकर, (ज्येष्ठ सिने पत्रकार आणि माजी ध्वनिमुद्रण अधिकारी)**
**(जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)**

अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या फुलोरा पुरवणीमधील आठवणीतली गाणी या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव. आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे अनंत पावसकर हे व्हीनस या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहीला आहे. कंपनीच्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष. ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच यातूनच ते आठवणीतली गाणी हे सदर लिहायला उद्युक्त झाले. (बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत).

इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना गुलमोहर नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे २५० विविध अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत.

मराठीतील पहिलं ई-बुक बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत आशीर्वाद पुरस्काराने गौरविण्यात आले होते. आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब या चार ई-बुक्ससह इतर अनेक ई-बुक्स सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते म्युझिक प्लॅनेट ही स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्यासारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.

(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)

‘एक ऋषितुल्य गुरू’ - पं. जितेंद्र अभिषेकी ♥ © लेखक : अनंत पावसकर ♥ ‘ई-साहित्य प्रतिष्ठान’ तर्फे प्रकाशित.

# 'एक ऋषितुल्य गुरू'
## - पं. जितेंद्रजी अभिषेकी

★ लेखक : अनंत पावसकर



'शास्त्रीय संगीत' म्हणताच नाकं मुरडणारे काय कमी आहेत या भूतलावर? 'वेस्टर्न'बद्दल आस्था दाखवतील. त्यातलं किंचाळणं, वाद्यांचं बडवणं, गोंगाटाला दाद देतील. वाहवा! ऽऽवाहव्वा!! करतील. पण संगीत नाटकं? छ्या!! बोअरींग प्रकार वाटायचा काही लोकांना. काय ते चार-चार पाच-पाच तास एकाच जागी बसायचं! पाच ओळींचं गाणं.. पण तेच ते आळवत आळवत पंधरा मिनिटं काढायची? नस्ती उठाठेव! रेडिओ बरा त्यापेक्षा. वाटलं तर ऐकली गाणी किंवा कान पिळताच मुसक्या आवळल्या. तुम्हाला ठाऊकच असेल.. पं. भास्करबुवा बखले (ग्वाल्हेर-आग्रा-जयपूर, जन्म १७.१०.१८६९, मृत्यू ८.४.१९२२) यांच्यापासून सुरु झालेल्या नाट्यसंगीताच्या सुसंपन्न परंपरेत मा. दीनानाथ, कुमार गंधर्व, बालगंधर्वांसारख्या दिग्गजांनी लोकप्रियतेची ध्वजा फडकत ठेवली होती, पण पन्नासच्या दशकानंतर संगीत नाटकाला एकप्रकारची मरगळ

आली होती. नाट्यसंगीत या उपशास्त्रीय गायन व संगीत प्रकाराकडे रसिक ढुंकुनही पाहत नव्हतं. संगीत नाट्यप्रयोगाकडे फिरकतच नव्हतं कुणी. रसिक प्रेक्षक रेडिओच्या भजनी लागलेले. रेडिओ गाजत होता. 'बिनाका गीतमाला' वाजत होती. फिल्मी संगीताच्या सुवर्णयुगाबरोबर लोक मराठी नाट्यसंगीताकडे पाठ फिरवण्यात धन्यता मानत होते. कारणही तसंच होतं. एकच प्याला, सौभद्र, मानापमान, मंदारमाला, स्वयंवर, संशयकल्लोळ अशा कैक नाटकांनंतर रंगभूमीनं दमदार नाटकं आणण्याचं जणू डेअरींगच केलं नव्हतं. 'मत्स्यगंधानं' मात्र कमाल केली. प्रा. वसंत कानेटकरांचं हे नाटक आलं तेच मुळी रणदुंदुभी वाजवत. पं. जितेंद्र अभिषेकी या गायक-संगीतकारांनी आपल्या सृजनशील, प्रतिभासंपन्न आविष्काराने मस्त नाट्यगीतांचा नजराणा रसिकांपुढे पेश केला. रंगभूमीला जणू नवसंजीवनी झाली त्यातल्या गाण्यांनी. नाट्यपदंच ती, पण त्यात नुसत्या आलापी-ताना नव्हत्या. काव्यही होतं आशयसंपन्न! नव्या-जुन्या संगीत प्रणालीचा सुवर्ण-सांमजस्य साधणारा आविष्कार! 'देवाघरचे ज्ञात कुणाला..', 'गुंतता हृदय हे..', 'नको विसरू संकेत मिलनाचा..', 'साद देती हिमशिखरे..' अशी पदं पं. रामदास कामतजींच्या आवाजात 'एचएमव्ही'च्या तबकडींवर उपलब्ध होताच रसिकांमध्ये नवचैतन्य आलं. का कुणास ठाऊक नंतर 'नाट्यसंगीत' हा कित्येकांचा पुढे खरंच, एक जिव्हाळ्याचा विषय झाला. 'मी शब्द-सुरांचा पुजारी आहे.. नव्हे अभिषेकी आहे! साहित्य-संगीत आणि नाटक या तिन्ही क्षेत्रांवर माझं प्रेम आहे, मात्र मी रंगतो सुरांतच!.. तेच माझे जीवनगाणे आहे..!' १९९५ साली 'चिपळूण' येथे झालेल्या ७६व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनातील अध्यक्षीय भाषणात पं. जितेंद्र अभिषेकींनी हे आवर्जून नमूद केलं होतं.

होय! ते पुजारीच होते.. संगीताचे! गोमंतकात 'मंगेशी' देवस्थानाच्या भारलेल्या परिसरात त्यांचा जन्म झालेला. बुधवार, दि. २१ सप्टेंबर, १९३२ या दिवशी. 'गणेश बलवंतराव नवाथे' उर्फ 'पं. जितेंद्र अभिषेकी !' त्यांचं आडनाव खरंतर 'नवाथे'!.. परंतु 'मंगेशी' येथल्या देवस्थानाची पूजाअर्चा, अभिषेक करण्याचं काम करणारे ब्राह्मण म्हणून त्यांच्या वाडवडिलांना 'अभिषेकी' हे आडनाव म्हणून चिकटलं. वडिल बळवंतराव (बाळुबुवा, भिकंभटजी) हे मा. दीनानाथजींच्या नात्यातले. या काकांना ते आपला गुरूही मानायचे. बळवंतराव कीर्तनकार म्हणून ख्यातकीर्त होते. यामुळेच संगीत आणि संस्कृत भाषेचे संस्कार छोट्या जितेंद्रवर व्हायचे. बाबांनीच छोट्या जितेंद्रला गाण्याचे प्राथमिक धडे दिले. तेव्हा ते जायचे एका पोर्तुगीज शाळेत. तिथलं वातावरण मनाला आवडत नव्हतं. घुसमट व्हायची. पण घरातल्या एकंदर संगीतमय वातावरणामुळे मन मात्र प्रसन्न राहायचं इतकंच. असेच दिवस जात होते. १९४३ साली, कुठल्याश्या निमित्ताने पुण्याला जायला मिळालं. स्वारी आनंदली. रमली! तिथल्या अनाथ विद्यार्थीगृहाच्या (आत्ताचं पुणे विद्यार्थीगृह) शाळेत आणि नंतर गोपाळ


हायस्कूलमध्ये मॅट्रिकपर्यंतचं शिक्षण झालं. १९४९ मध्ये ते शालांत परिक्षा उत्तीर्ण झाले. मराठी, कोंकणी, पोर्तुगीज, इंग्रजी आदी भाषा अवगत झाल्या होत्या. पं. भास्करबुवा बखले यांचे एक शिष्य पं. नरहरबुवा पाटणकर आणि पं. यशवंतराव मराठे या दोघांनी ह्या जितेंद्रमधला स्पार्क हेरला होता. ते त्याला नेहमीच मार्गदर्शन करायचे. गायनाचं खरंखुरं शिक्षण हे इथेच मार्गी लागलं. पुढे ते बेळगावला गेले. तिथे त्यांना पेटीवादक विठ्ठलराव कोरगांवकरांकडून संगीताचे धडे गिरवायला मिळाले. एका कार्यक्रमात बुजुर्ग गायिका श्रीमती गिरिजाताई केळकर यांची भेट होताच अभिषेकींनी त्यांच्याकडूनही काही शिकण्याचा मनसुबा व्यक्त केला. गिरिजाताईंनी ह्या होतकरू तरूणास आवडीनं शिकवलं. मॅट्रिकनंतर पुढे काय? या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठी स्वारी मुंबईला आली. त्यांनी 'भवन्स कॉलेज' मुंबई विद्यापीठातून (१९५२) पदवी प्राप्त केली. विषय अर्थातच संस्कृत! १९५२ मध्ये आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावर नोकरी मिळताच, आयुष्य काहीसं स्थिरस्थावर झालं. आकाशवाणीवर तेव्हा कोकणी विभाग नुकताच सुरू झालेला. संगीत सयोजक असल्याने त्यांना इथे नवे प्रयोग करायला वाव मिळायचा. ही नोकरी करत असतानाच, ओळखीच्या म्हणा किंवा स्वमेहनतीने, अत्रोली घराण्याचे उस्ताद अझमत हुसैन खाँ यांच्याकडे गाण्याचं शास्त्रशुध्द शिक्षण सुरू झालं. शास्त्रीय संगीताच्या अभ्यासासाठी, भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाल्यानंतर (१९५९) ज्येष्ठ गायक पं. जगन्नाथबुवा पुरोहित (गुणीदास) यांच्याकडे दीर्घकाळ तालिम मिळाली, हे विशेष! याबरोबरच अभिषेकी यांनी पं. निवृत्तीबुवा सरनाईक, पं. रत्नाकर पै, उस्ताद अझिझुद्दीन खाँ, मास्टर नवरंग नागपूरकरजी आणि सन्मा. श्रीमती केसरबाई केरकर इत्यादी दिग्गजांकडून मार्गदर्शन घेऊन आपली गायनकला अधिकाधिक समृद्ध केली. त्यांनंतर त्यांनी उस्ताद गुलुभाई जसदनवालांकडून 'जयपूर' घराण्याच्या गायकीची काही वैशिष्ट्ये आत्मसात केली. अथक परिश्रम आणि विविधांगी व्यासंगामुळेच की काय, त्यांनी आपली स्वतःची अशी शैली निर्माण केली. ज्येष्ठ अभ्यासकांच्या शब्दांत सांगायचं तर, गमक-युक्त स्वरावली, प्रतिमेचा स्वतंत्र आविष्कार, उत्कट, भावनापूर्ण आणि सौदर्यप्रधान प्रस्तुती, रागभावाला व रागस्वरूपाला योग्य स्वराकृती देत केलेले प्रचलित आणि अनवट रागांचे गायन, अशा गोष्टींमुळेच त्यांचे सादरीकरण अविस्मरणीय होत असे. भावपूर्ण आवाजातील सुंदर व संथ अशी आलापी, मोकळा, स्वच्छ व दीर्घकाळ लावलेला षडज, अप्रतिम लयकारी, 'आग्रा' घराण्याचि वैशिट्ये दाखवतच, बोल-बनावाची सुयोग्य पखरण आणि आक्रमक गायकीचा अत्यंत प्रभावी असा रसिकांना थक्क करणारा आविष्कार! व्वा! ती शब्दांची फेक, भरपूर असा दमसास व त्याच दमसासाने जाणारी तानाईत, हीच त्यांच्या 'ख्यालगायकीची' गुणवैशिष्ट्ये होत. शास्त्रीय संगीताचे सन्माननीय ज्येष्ठ अभ्यासक, पुढे असंही सांगतात की, मैफलीत ते खास अनवट रागांमधली (उदा.. खोकर, जैत, चारूकेशी,

कौंस-गंधार, मिश्र शिवरंजनी इ.) नवनव्या बंदिशी सादर करत असत. 'श्याम-रंग' या टोपणनावाने त्यांनी विविध रागांत बंदिशी सादर केल्या आहेत. खरंच, हे सगळं थक्क करणारं !!

सन्मा. पं. जितेंद्र अभिषेकीसाहेबांच्या सुविद्य पत्नीचे नाव 'विद्यावती' असून 'पं. शौनक अभिषेकीजी' आणि 'मेखलाजी' ही त्याची गुणी अपत्ये. ज्येष्ठ लेखक/समीक्षक यांच्यासोबतच्या संभाषणातून माहिती समजली की, 'पं. जितेंद्र अभिषेकीजी' यांनी लोणावळा या गिरीस्थानात सुमारे दहा वर्षे 'गुरुकुल' पद्धतीने संगीत दिले होते. पुढे १९८७ साली पुण्यात स्थायिक झाल्यानंतर त्यांनी आपल्या काही अमुक शिष्योत्तमांना 'गुरुकुल' पद्धतीने संगीताचं ज्ञान प्रदान केलं. तसेव 'तरंगिणी-प्रतिष्ठान' स्थापन करण्यात पुढाकार घेतला. होतकरू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास आपलेपणाने मदत करणं तसंच वृद्ध कलावंतांना आर्थिक मदत करणं, हे कार्य त्यांनी आपलेपणाने पुढाकार घेत केलं आहे! होमी भाभा संशोधन केंद्राकडून 'लोकनाट्यातील संगीत' या विषयावरील संशोधनासाठी 'पं. अभिषेकीजींना' शिष्यवृत्ती मिळाली होती. त्याद्वारे त्यांनी प्रदेशपरत्वे 'कुटियाट्टम, मोहिनीआट्टम, कथकली, माच, नौटंकी, दशावतार' इत्यादी लोकनाट्यातील संगीताचा अगदी मनःपूर्वक अभ्यास केला. पं. रविशंकरजींबरोबर ते १९७० मध्ये अमेरिकेला गेले होते. तिथे सुमारे पाच-सहा महिने त्यांनी 'किन्नरम' या त्यांच्या संस्थेत त्यांनी मानधनाचीही अपेक्षा न करता विद्यादानाचेही कार्य केले.

आकाशवाणीच्या 'मुंबई केंद्रावर' नोकरी करत असताना त्यांनी अनेक रेडिओ-प्रोग्राम्ससाठी शीर्षक गीते किंवा थीम्स कंपोज केल्या, ज्याची खूपच वाहवा झाली. एवढंच नव्हे तर.. नंतर काही दिवसांत कविराज बा. भ. बोरकर, कवि राजा बढे यांच्या कवितांवर बावनकशी चालींचा मुलामा देण्याचं काम त्यांच्यासाठी खूप आनंद देणारं टरलं होतं. 'गोमू माहेरला जाते हो नाखवा, हिच्या घोवाला कोकण दाखवा..' यासारखी ठसकेबाज गाणी याच काळातली. (हे गाणं आपल्या पं. जितेंद्र अभिषेकीजींनी गायलंय यावर विश्वासच बसत





नाहीय ना?) अशा अनेक गाण्यांच्या मुळाशी होते ते पं. जितेंद्र अभिषेकीजी. एकीकडे हिन्दी सिनेमासंगीताने चांगलंच बाळसं धरलं होतं. चित्रपटसंगीताचं सुवर्णयुग ऐन जवानीत असल्याचे दिवस होते ते. अनेक दिग्गज नट नाट्य-संगीत क्षेत्रात कार्यरत असूनही याच काळात मराठी संगीत रंगभूमीला जणू मरगळ आलेली. त्या काळात 'एच.एम.व्ही' तर्फे प्रदर्शित झालेल्या ७८आर.पी.एम., 'ईपी'च्या साडेतीन-चार मिनिटांच्या रेकॉर्ड वरच्या गाण्यांची लोकप्रियता वाढीस लागल्याने, पंधरा-वीस मिनिटांच्या ख्याल-गायकीसारख्या नाट्य संगीताबद्दल लोकांना अजिबात आस्था उरली नव्हती. कुठेतरी परिवर्तनाची ठिणगी पडायला हवी होती. नवसंजीवनीचा मंत्र हवा होता! नाट्य-संगीत दिग्दर्शक म्हणून अभिषेकीबुवांनी केलेली कामगीरी अतिशय मोलाची आहे! कशी ते पहा. 'संगीत मत्स्यगंधा'ने ही कोंडी फोडली, हे सर्वश्रुतच आहे.. मग काय! पं. जितेंद्र अभिषेकी हे नाव लागलीच प्रकाशझोतात आलं. 'ययाती आणि देवयानी', 'हे बंध रेशमाचे', 'धाडिला राम तिने का वनी', 'लेकुरे उदंड जाली'.. किती नावे सांगू? 'कट्यार काळजात घुसली' हे पुरूषोत्तम दारव्हेकरांचं नाटक, त्यांचं एकट्याचं राहिलं नाही. ते गाजलं डॉ. वसंतराव देशपांडेसाहेबांच्या लाजवाब अदाकारीनं. पं. जितेंद्र अभिषेकीबुवा यांच्या संगीत-दिग्दर्शनाने.. डॉ. वसंतराव देशपांडे यांचा खाँसाहेब आणि पं. जितेंद्र अभिषेकींनी संगीतबध्द केलेली गाणी, ही दोन्ही सौंदर्यस्थळं होती त्यातली. 'घेई छंद मकरंद..', 'या भवनातील गीत पुराणे..', 'तेजोनिधी लोहगोल..', 'सूरत पिया की न छिन बिसराये..' ही गाणी, आजही आपल्या आठवणीतल्या कुपीत बंदिस्त आहेत. ('कट्यार काळजात घुसली' या कलाकृतीबद्दल सांगतोय! ही संगीत नाट्य-कलाकृती म्हणून 'नाट्यसंपदा' या मातब्बर संस्थेतर्फे १९६७ साली रंगमंचावर आली होती. तो पहिला प्रयोग २४ डिसेंबर, १९६७ रोजी झाला होता! (भाग १ तसेच भाग २ व ३ फक्त 'क्लिक' करा) या संगीत-नाटकाच्या पहिल्या संचात.. पं. भार्गवराम आचरेकर (पं. भानूशंकर म्हणून) तर पं. वसंतराव देशपांडे हे खाँसाहेबाच्या भूमिकेत होते. नंतरच्या संचात पं. प्रसाद सावकार (सदाशिव) तर ज्येष्ठ सन्मा. गायिका फैयाज (झरिना) अशा मातब्बर गायक कलावंतांच्या भूमिका होत्या. पुढच्या अनेक संचात.. कलावंत बदलत गेले. पं. प्रकाशजी घांग्रेकर, बकुळ पंडित, बाळकराम, शंकर घाणेकर वगैरे महान कलावंतानी अमुक भूमिका साकारल्या होत्या. नंतर बरीच स्थित्यंतरे आली. महत्त्वाचं म्हणजे यावर हल्लीच चक्क एक 'चित्रपट' सुद्धा आला.. गाजला!! (आपलं सुदैव हेच की.. या नाटकातील किंवा नंतर सादर केलेल्या चित्रपटातील सुद्धा.. उपलब्ध झालेली सर्व पदे/ती गाणी, ती नाटके वगैरे 'यू-ट्युब' मुळे आज आपल्यासाठी उपलब्ध झालेलं आहे.. 'कट्यार काळजात घुसली' या संबंधित सर्व 'ऑडिओ व व्हीडिओ' बाबतीतील सर्वच्या सर्व उपलब्ध झालेल्या 'यू-ट्युब-लिंक्स', 'प्ले-लिस्ट' रूपाने या लेखासोबत खास तुमच्यासाठी देत आहे. आपल्या 'मोबाईलवर' किंवा आपल्या स्मार्ट-

टीव्हीवर, 'ब्ल्यू-टूथने'.. केवळ 'यू-ट्युब' कनेक्ट करायचं. बस्स!! एका 'क्लिकवर' सर्व खजिना उपलब्ध होईल..) पं. अभिषेकीबुवांचा सांगीतिक सिलसिला पुढे असाच सुरु राहिला. पं. जितेंद्र अभिषेकींना एकामागोमाग एक अशी मोजून पंचवीस नाटकं संगीतबध्द करायला मिळाली. (मुलाखत पहा!)

पं. जितेंद्र अभिषेकींनी संगीतबध्द केलेल्या गाण्यात अमुकच एका संगीत घराण्याचं प्रतिबिंब नाहीय.. हे महत्त्वाचं! त्यांनी मुलाखतीत अगदी दिलखुलासपणे सांगितलं.. '..एकाच प्रकारचं खाणं, नंतर नंतर बेचव, रसहीन किंवा असंतुलित ठरतं, म्हणून माणसानं कसं चतुरस्र असावं, चौरस आहार घ्यावा, चौकस राहावं.. अशानं आपल्या कर्तृत्वाच्या कक्षा खचितच अधिकाधिक विकसित होतात..!!' अशा मताचे होते पं. जितेंद्र अभिषेकीजी. तुम्ही त्यांनी गायलेली किंवा संगीतबद्ध केलेली गाणी नीट अभ्यासा... 'यमन', 'यमन-कल्याण', 'हंसध्वनी', 'शिवरंजनी' तसेच 'मुलतानी', 'चारूकेशी' किंवा 'तिलक कामोद' अशा रागात त्यांनी सुंदर रचना केलेल्या आढळतात. आता अमुकच राग अमुक घराण्याच्या स्टाईलनं सादर होणार म्हणून बेड्या पाळण्याचं त्यांनी पातक केलेलं नाही. आपल्या स्वतःच्या कुवतीनं, अभ्यासपूर्ण पण ध्येयवादी दृष्टीनं, तो तो आविष्कार-शाहकार रसिकांच्या पसंतीस पडेल अशाच प्रकारे पेश केला आहे. काही संगीत-नाटकांमधील पदे संगीतबद्ध करताना त्यांनी जुन्या पारंपरिक रागांऐवजी अक्षरशः नवीन रागांमध्ये (उदा. 'गावाती', 'बिहागरा') चाली गुंफल्या आहेत, हे विशेष. 'वृंदगानाचा' प्रयोग त्यांनी केला होता. त्या चाळीसेक गायकांनी नोमतोम, धृपद, धमार, मध्यलयीतील ख्याल, ठुमरी, टप्पा, तराणा व लोकगीत हे प्रकार सादर केले आहेत. एक उदाहरण सांगू? 'गर्दसभोवती रान साजणी..' (मत्स्यगंधा - आशालता वाबगावकर) यात 'शास्त्रीय संगीतातील' नेमका कोणता राग आहे? संगीत नाटकांतील अशी गीतं ऐकताना, त्यांचा प्रचंड आवाका लक्षात येतो.

तुम्हा-आम्हा सर्वांनाच ठाऊक आहे म्हणून सदासुहागन अशा 'भैरवी' रागातील गाण्यांचं उदाहरण घेऊया. 'प्रथम प्रहर की रानी' अशा गौरवाने उल्लेखावा असा हा सर्वपरिचित आणि सर्वांगसुंदर असा राग. तो फिल्मी गीतांमधून जसा वेगवेगळ्या मूडमध्ये सादर झाला, मात्र अभिषेकीजींनीही तो पेश करताना, त्यातले रंग अधिक गहिरे कसे होतील, याकडे आवर्जून पाहिल्याचं जाणवतं. आपल्या माहीत असलेल्या गाण्यांबद्दल बोलायचं तर सहजच काही उदाहरणं देतोय.. 'दो हंसो का जोडा..', 'दिल का खिलौना हाए टूट..', 'कैसे आऊँ जमुना के तीर..' अशा गाण्यातलं भेरवीचं रूप.. किंवा 'लागा चुनरी में दाग..', 'मैं पिया तेरी तू माने या न माने..', 'मनभावन के घर..', 'ऐ मेरे दिल कहीं और चल..', 'अजहून आए बालमा..', 'दुनिया ना भाए मोहे अब तो बुला ले..' या गाण्यातली भैरवी थक्क करणारी आहेच ना!?. पण पं. जितेंद्र अभिषेकीजींनी हाच राग आधारभूत घेऊन.. आपल्या स्वतःच्या संकल्पनेतून अभ्यासपूर्ण संगीताविष्काराने नटविलेल्या त्यांच्या भैरवीतल्या रचना मनाला जास्त भिडणाऱ्या आहेत, असं नाही वाटत? 'कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर..'

आणि 'तम निशेचा सरला..' ही पदं आजही आपल्या मनाला भावतात की नाही? या संगीतसाधकाची जादुगरी इतकी काळजाला भिडणारी की कुसुमाग्रजांच्या 'ययाती आणि देवयानी' या संगीत नाटकातली 'सर्वात्मका सर्वेश्वरा..' ही रचना त्यातल्या प्रासादिक भावनेमुळे प्रार्थनेच्या दर्जाइतपत पोहोचलीय. टप्पा. ठुमरी, दादरा, ख्याल आपणासारख्या सामान्यांसाठी अनवट चीजाच पण अभिषेकींनी त्यांची प्रत्येक रचना सर्वसामान्यांच्या हृदयाचा ठाव घेईल अशा ताकदीनं घडविल्या आणि त्याचं सुंदर संकलित रूपडं पुढे 'ईपी'च्या साडेतीन-चार मिनिटांच्या रेकॉर्डवर उपलब्ध करून दिलं. 'लेकुरे उदंड जाली' मध्ये तर त्यांनी चक्क उडत्या चाली देण्याचा प्रयोग केलेला. नाटकांसाठी पार्श्वसंगीत हे आधी रेकॉर्ड करून नंतर ते प्रसंगानुरूप वाजवायचं ही आईडिया मुळात अभिषेकीजींचीच. 'गर्द सभोती रान साजणी..', 'अर्थशून्य भासे मजला.. ', 'नको विसरु संकेत मिलनाचा.. ', 'गुंतता हृदय हे.. ', 'यतिमन मम मानित या..', 'प्रेम वरदान.. ' अशा सुंदर रचना नाटकातल्या असूनही आज आपल्या ओठावर आहेत हे यश, ही किमया आपल्या अभिषेकी बुवांचीच !!

ते स्वतः रियाजी गायक असल्यानेच की काय, त्यांच्या प्रत्येक गाण्यात स्वरांचा लगाव, लयीवरची हुकुमत, स्पष्ट शब्दोच्चार आणि तानांना महत्त्व अशी वैशिष्ट्ये आढळतात. 'पुलं' एकदा म्हणाले होते.. 'जितेंद्रने.. दत्तासारखे एकवीस गुरु केलेत असं मला वाटतं. प्रत्येक गुरूचं नेमकं काय घ्यायचं हे त्यानं ठरवलं. अर्थात तो स्वतःही गुरू म्हणून चांगलाच आहे पण त्यापेक्षा तो शिष्य म्हणून अधिक चांगला आहे. प्रारंभी त्याच्यावर संस्कार झाला तो आग्रा घराण्याचा. आता त्याच्या गाण्यांमध्ये आग्रा घराणं दिसतं पण आग्रेवाल्यांचं ते गाणं आहे असं म्हणता येत नाही, कारण त्या गाण्यांमध्ये जितेंद्रची बुध्दी मिसळलेली असते, हे त्याचं फार मोठं वैशिष्ट्य आहे असं मला वाटतं..!'

आपले जिनियस पं अभिषेकीबुवा, 'गोवा कला अकादमीचे' मानद सल्लागार व 'संस्कार भारती' चे सदस्य होते. १९९५ साली 'चिपळूण' येथे झालेल्या ७६व्या 'अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाचे' त्यांनी अध्यक्षपद भूषविले होते. पं. जितेंद्र अभिषेकीजी यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे. १९६९ साली होमी भाभा फेलोशिप, १९७८ साली नाट्यदर्पण, १९८८ साली पद्मश्री, तर संगीत-नाटक अकादमी पुरस्कार मिळाला १९८९ साली! पुढच्याच काही महिन्यात महाराष्ट्र गौरव, १९९२ साली गोमांतक मराठी अकादमी अॅवॉर्ड, बालगंधर्व पुरस्कार (१९९५), सूरश्री केसरबाई केरकर पुरस्कार (१९९६), मा. दिनानाथ मंगेशकर अॅवॉर्ड (१९९६) तर लता मंगेशकर पुरस्कार (१९९६).. यानंतर बालगंधर्व पुणे-नाट्यपरिषद आणि नासिकच्या कैलास मठाचे पुरस्कारही मिळाले आहेत.

एकंदर नाट्य-संगीतात तसेच संपूर्ण 'संगीतक्षेत्रातील' त्यांचं एकंदर योगदान पाहता.. तसंच आपल्या

शिष्य-प्रभावळीतील, अनेक होतकरू व प्रतिभाशाली गायक, संगीतकार यांच्यासाठी, त्यांनी केलेलं कार्य, खचितच अभिमानास्पद आहे. जे त्यांच्या शिष्योत्तमांना त्यांच्या स्वतःच्या पुढील आयुष्यात व एकंदर दैदीप्यमान वाटचालीसाठी खूपच उपयोगी ठरलं होतिं, हे विसरून कसं चालेल ? 'शिष्य घडविणे' तसंच, नाट्यसंगीत क्षेत्रात 'शास्त्रीय-उपशास्त्रीय' असे नवनवोत्मेषशाली प्रयोग करणं. या अनेक योगदानासाठी त्यांना 'भारतरत्न' सारखा 'सन्माननीय पुरस्कार' मिळायला हवा होता.. असं मला मनापासून वाटतं.

पं. अभिषेकीबुवांचे शिष्यात्तमांमध्ये अनेक सन्माननीय प्रभृतींचा समावेश आहे. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अनेक शिष्योत्तम घडविले. गोव्यातल्या अनेक कलावंतांसाठीही त्यांनी योगदान दिलंय. त्यांच्या शिष्यवृंदाच्या गायकीवर बुवांचा प्रभाव जाणवतो.. ही नावं आज फार मोठी आहेत. सगुणसंपन्न पुत्र पं. शौनक, पं. प्रभाकर कारेकरजी, पं. अजितकुमार कडकडेजी, शुभा मद्गलजी, आशाताई खाडिलकरजी, पं. सुधाकर देवळे, देवकी पंडितजी, पं. महेशजी काळे, पं. अरूण आपटेजी, पं. विनोद डिग्रजकरजी, पं. हेमंत पेंडसेजी, पं. मोहनकुमार दरेकर, पं. विजय कोपरकरजी, पं. (प्रा) समीरजी दुबळे, पं. रघुनाथराव फडकेजी आदी त्यांची गानपरंपरा पुढे नेत आहेत. ही नावं आज फार मोठी आहेत. पं. शौनक अभिषेकी हा त्यांचा मुलगा गाण्यात चांगलाच प्रवीण आहे पण त्याचं यश पहायला बुवा आता या दुनियेत नाहीत याचं वाईट वााटतं. शांत स्वभाव पण कडक शिस्तीचे गुरू, आग्रही मतप्रवाह असा बुवांचा एकंदर खाक्या. मैफलींतून ख्यालगायकीबरोबरच त्याच उत्कटतेनं भक्तिगीतं, अभंग, नाट्यसंगीत गाणारे म्हणून त्यांची कारकीर्द रसिकांच्या कानामनात रुजलीय.

बुवांच्या प्रत्यक्ष मैफलीचा योग आला नव्हता परंतु मी 'व्हीनस' या मातब्बर म्युझिक कंपनीमध्ये ध्वनिमुद्रण अधिकारी पदावर कार्यरत असताना, आमच्या कंपनीसाठी पं. शशांक कट्टी साहेबांच्या पुढाकाराने (संगीतकार : शांक-नील फेम) 'क्लासिकल गॅलक्सी सिरीज' नामक एक खूप मोठा 'प्रोजेक्ट' सादर झाला. त्याचा प्रस्ताव घेऊन पुण्यातील त्यांच्या घरी, निवांत भेट झाली. गप्पा झाल्या. मुलाखत घेतली. प्रस्ताव मांडले. सुदैवाने त्यांनी होकार दिला. बुवांच्या शास्त्रीय संगीत गायनाच्या दोन तर अभंगगायनाची एक, अशा ध्वनिफितींच्या ध्वनिमुद्रणप्रसंगी सुद्धा भेट होत राहिली.. खूप प्रेमळ सहवास मिळाला. यानंतरही संपर्क असायचा. त्यांचा गुणसंपन्न पुत्र, आमचा लाडका 'शौनक', तर सतत संपर्कात असायचा/आहे. त्याच्याकडून तेव्हां वरचेवर बुवांच्या प्रकृतीविषयी कानावर यायचं. त्यांना 'मधुमेहाचा' त्रास होता.. पण ते असे अचानक जगाच्या मैफलीतून उठून जातील असं नव्हतं वाटलेलं.. (शनिवार दि. ७ नोव्हेंबर, १९९८, वयाच्या ६९ वर्षी)

पुलंच्या ८०व्या वाढदिवसानिमित्त पुण्यातल्या 'पुलकितांनी' बहुरुपी-८० असा जबरदस्त कार्यक्रम आखलेला. 'वैभव नाट्यसंगीताचे' या गाण्यांच्या कार्यक्रमाचा शुभारंभ व्हायचा होता. सगळी तयारी झालेली. इतक्यात भरत नाटयमंदिरात तालिमी चालू असताना ही मनहूस वार्ता येऊन थडकली. शोककळा पसरलेली

आयोजकांत आणि कलावंतांत. बुवांच्या तब्बल बारा गाण्यांचा अंतर्भाव असलेल्या कार्यक्रमाला बुवांचे आशीर्वाद नसावेत ? शिष्यमंडळीत दुःखाचे सावट होते.. आणि शौनक त्या शोकमग्न स्थितीतही कार्यक्रमाला आला.. 'शो मस्ट गो ऑन' असं म्हणत गायला उभा राहिला. उपस्थितांच्या डोळ्यात अश्रू दाटलेले. एक अजीब सन्नाटा होता हॉलमध्ये.. कैवल्याचं चांदणं आता लोपलंय ही जाणीव क्लेशकारक होती.. संगीत-रंगभूमी पुन्हा अंधःकारात चाचपडणार तर नाही ना असा सवाल मात्र मन पोखरत होता.. आमचा लाडका शौनक गात होता.. आपल्या जन्मदात्याला.. आपल्या गुरूंना स्वर-सुमनांची श्रध्दांजली वाहत होता!!

'सर्वात्मका सर्वेश्वरा..सर्वात्मका सर्वेश्वरा..'

© - अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार आणि संगीत संयोजक)
anantpavaskar@gmail.com (९८२००२२४१७)

♥




♥

## गायक/संगीतकार 'पं. जितेंद्र अभिषेकीजींची' आठवणीतली गाणी..

| | |
|---|---|
| १. अबीर गुलाल उधळीत रंग.. | https://youtu.be/eaI8zvNSYas?si=ZC0QljqHIeblKP30 |
| २. घेई छंद मकरंद.. | https://youtu.be/VHXPVWJbkm4?si=9upnBFvCb8hckYhr |
| ३. नाचत ना गगनात नाथा.. | https://youtu.be/2pF9-VxgETc?si=cmrkJiaOoD37U0dJ |
| ४. काटा रुते कुणाला.. | https://youtu.be/TeNAk_yYmjw?si=FkwstZFjC6nb2DmA |
| ५. दिव्य स्वातंत्र्य रवि.. | https://youtu.be/ZvXVL0iOATc?si=jMJOiAYzNdKWv47d |
| ६. सर्वात्मका सर्वेश्वरा.. | https://youtu.be/L36_XB7x3IU?si=4o6E2eim74HdvNDC |
| ७. संतभार पंढरीत.. | https://youtu.be/GNFETw63X0U?si=pAV87gj0hyB-sRA6 |
| ८. सखे शशीवदने.. | https://youtu.be/SikLYnL07hI?si=VW1eSrJRmQ4vdrYd |
| ९. रति रंगी रंगे ध्यान.. | https://youtu.be/_GMiwLIZqHI?si=CpyOUTwgFwvNn9yl |
| १०. सुहास्य तुझे मनास मोही.. | https://youtu.be/kmGeigOguMg?si=Fe8KoEWRi-xtyKza |
| ११. हे बंध रेशमाचे.. | https://youtu.be/dVwArI5w5J8?si=kTeT6vYA7LKFxFzm |
| १२. कैवल्याच्या चांदण्याला.. | https://youtu.be/r5LLZkuGuGA?si=y_kZFLyMYj4XmvXl |
| १३. शब्दांवाचुन कळले सारे.. | https://youtu.be/xgI6O5MvXN8?si=K1DKk6yzjd-5jCjD |
| १४. माझे जीवनगाणे.. | https://youtu.be/RWG6VZwwRS8?si=Nzd7oqq_ZVxYCOzX |
| १५. कशी तुज समजावू सांग.. | https://youtu.be/fp5eid3z_30?si=zN55fE7a2h4Cv9lC |
| १६. तपत्या झळा उन्हाच्या.. | https://youtu.be/CAoxHgWkGEA?si=iAZx2Gf49M3VTdEf |
| १७. रंध्रात पेरली मी आषाढ.. | https://youtu.be/EQcYrqxUeQA?si=6qirdwBENZI39ey6 |
| १८. मन लोभले मन मोहले.. | https://youtu.be/bErvBB68Bew?si=izutzTxGq9L67PXY |
| १९. बोलावा विठ्ठल पहावा.. | https://youtu.be/2lcBcBc8D4w?si=rSq2mFM3R9_1PyZu |
| २०. सुखाचे जे सुख चंद्रभागे.. | https://youtu.be/yiLW9YwP0Vk?si=Gdfqcz-6WPCXKyOn |
| २१. नाही पुण्याची मोजणी.. | https://youtu.be/aej2KW2uoFY?si=LjfocRNfDcGHM5zY |
| २२. हरिभजनावीण काळ.. | https://youtu.be/g6wSp6kh2GA?si=UWDTAs4K8h4Sl7Ti |
| २३. जेथोनी उद्‌गार प्रसवे.. | https://youtu.be/QaOpsyt_POI?si=KU7QNJ0gthavk1ay |
| २४. विश्वाचा विश्राम रे.. | https://youtu.be/RTXvupES6lE?si=ISaq5hDEoNM4Wpmk |
| २५. पांडुरंग त्राता पांडुरंग दाता.. | https://youtu.be/ISpA_c70-vA?si=tEEJrPapW7hKLvdd |
| २६. संताचिया गावी प्रेमाचा.. | https://youtu.be/QQbXHcTerVQ?si=9CfzU_VBnRhR8V8k |
| २७. परब्रह्म भेटी लागी.. | https://youtu.be/Sx5vZwyMpHU?si=C8MVtCLUFsHp_y7z |
| २८. पंढरीचे सुख नाही त्रिभुवनी.. | https://youtu.be/OFAipRhLBlQ?si=AbkcImOFPP4-qaWY |
| २९. लागी कलेजवा कट्यार.. | https://youtu.be/nGkRhSPosFU?si=i3ediY05s8QDLJcL |

## पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या काही अल्बम्सच्या खास ‘प्ले-लिस्ट्स’ :

**१. स्वरतरंग - एक खास असं माझं संकलन..**
https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_maj0CbvP35Lrog_mAfEz4pgyFocKzNgrs&si=BerXNRBUvuYOnB-1

**२. पं. जितेंद्र अभिषेकी - शास्त्रीय संगीत**
https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_nmBQcbE8eOePqyfSsmFDhjTHz1rIw9_dw&si=F6Z31l6vkDiiiE50

**३. पं. जितेंद्र अभिषेकी - शास्त्रीय संगीत**
https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_m4yOHlvNk4bXY1LwjL6QZTRFwT-289kOk&si=hpow7kRtiOLPtprP

**४. पं. जितेंद्र अभिषेकी - ‘दिंडी’ अल्बम**
https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_n_XD9aqxkE_rgDJ-8NcP8OSIzf6rCUfUs&si=Y_C4-YuC9Ym1ukvd

**५. सकाळचे शास्त्रीय राग - संकलन**
https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_nnteFBhIGd5UPRa6ZM93i9adn_ZBiEi1c&si=R9VgZQk2ENL8Z56h

**६. पं. जितेंद्र अभिषेकी - शास्त्रीय राग**
https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_mHwy433Z8KP7rTWFqWq7d_Szo4msVIAe4&si=KynoHtpFzaLHIC04

**७. पं. जितेंद्र अभिषेकी - गीत संकलन**
https://youtube.com/playlist?list=OLAK5uy_nNVx4J7l6NMas4YCPpn9G77LWuzi36lmo&si=EtLGQgt1CidXDfxk

## पं. जितेंद्र अभिषेकी यांचे अल्बम्स :

**१. अवघे पावन पंढरपूर :** https://youtu.be/EZgcpcs2e9Q?si=ruL6LDn-9phBd-Uu

**२. सदाबहार गाणी :** https://youtu.be/qcscBr_USZE?si=uBbP4V4BPSrhNpgE

**३. गीत संकलन :** https://youtu.be/6yhykZkUTtg?si=5JsVoE791Hl2a2UZ

## इतर गाजलेली नाट्यपदे व गीते..

१. अर्थशून्य भासे मजला.. :
https://youtu.be/55j5ekkg0xY?si=dJtzasVXDk8wJy5g

२. नको विसरू संकेत मिलनाचा..
https://youtu.be/Tg3ZAUYzU8k?si=0QoAcq0TwysFTKEx

३. यतिमन मम मानित या..
https://youtu.be/Px_NEvtCiyw?si=UIvkw3FRaQYTX8Ip

४. प्रेम वरदान..
https://youtu.be/aYvxYbi7Gq0?si=PCwApyshHM21cNcK

५. गोमू माहेरला जाते हो..
https://youtu.be/IbeSjndSByo?si=DYpHEZ-DVro3Myde

६. गर्द सभोवती रान..
https://youtu.be/hyxvKjk_x3Y?si=_S42trbjKoaifedU


'मराठी नाटके/संगीत नाटके'/नाट्यगीते.. विषयावर उपलब्ध झालेल्या 'यू-ट्युब-लिंक्स' इथे देत आहे. तसंच पं. अभिषेकी बुवांच्या शिष्योत्तमांच्या 'फोटोवर' नक्की 'क्लिक' करा. (काही 'लिंक्स', या थेट 'पं. अभिषेकीसाहेबांशी' संबंधित नाहीयत. परंतु 'मराठी नाटकवेड्या' रसिकांसाठी.. मराठी नाटकांच्या सर्वसमावेषक अश्या 'यू-ट्युब-लिंक्सचं' हे संकलन, तुमच्यासाठी पर्वणीच ठरेल, यात शंकाच नाही.) (आपल्या 'मोबाईलवर' किंवा आपल्या स्मार्ट-टीव्हीला 'ब्ल्यू-टूथने' कनेक्ट होत.. केवळ एका 'क्लिकवर' सर्व खजिना उपलब्ध होईल.. रमून जा..! दिपून जा!)

१. मराठी संगीत नाटके व नाट्यसंगीत :
https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi97oASK4GDub3CgW7BRmJXuA&si=V7MfAArXZ3F8aBhv

२. तुमच्या व माझ्या आवडीची अनेक मराठी नाटके : (एक खास संकलन.. जस्ट एन्जॉय !!)
https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi95VmJghAoL6p_79NxqLoTwO&si=WTeA4WYIAiLlT7_q

३. मराठी नाट्यसंगीत (एक खास संकलन):
https://youtube.com/playlist?list=PL3IktVe6Pi94VNE5B21ZVcsfSNbFEpFt7&si=0pDrJuzP4XUGXV4T

## ‘ऋषितुल्य गुरू’ - ‘पं. जितेंद्र अभिषेकीबुवा’ यांचे ‘शिष्योत्तम’!



























पं. महेश काळेजी


पं. मोहनकुमार दरेकर



पं. हेमंत पेंडसेजी


पं. (प्रा.) समीरजी दुबळे


पं. सुधाकर देवळे


पं. विजय कोपरकरजी


पं. अरूण आपटेजी


पं. विनोद डिग्रजकरजी

Whatsapp: 9987737237 esahity@gmail.com

For 'E-Sahitya' E-Books.. Visit/Log on https://www.esahity.com © - 'ई-साहित्य प्रतिष्ठान'


'अनंत पावसकर' यांची प्रकाशित झालेली ही काही'ई-बुक्स'.. फक्त 'क्लिक' करा..























♥